रेशीम संचालनालयाच्या आस्थापनेवरील अस्थायी पदे दि.१.०१.२०१८ ते दि. २८.०२.२०१८ या कालावधीत पुढे सुरु ठेवणेबाबत...

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांकः आस्था २०१८/प्र.क्र.४ /रेशीम कक्ष

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक : २४ जानेवारी, २०१८

वाचा :

१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक सीएसबी-१०९४/(६१५३)/ उद्योग-५, दिनांक २७.८.१९९७

२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक:रेशीम-१३०८/प्र.क्र.३३/रेशीम कक्ष, दिनांक २२.३.२०११

३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक:रेशीम-१३११/प्र.क्र.२१७/रेशीम कक्ष, दिनांक २२ मार्च २०१२.

४) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. आस्था १९१४/प्र.क्र.२४/रेशीम कक्ष, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१४.

५) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. आस्था १९१५/प्र.क्र.२७/रेशीम कक्ष, दिनांक १० मार्च, २०१५.

६) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांकः आस्था १९१६/प्र.क्र.१३३ /रेशीम कक्ष, दि.५ ऑक्टोबर २०१६

७) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. आस्था १९१७/प्र.क्र.१३/रेशीम कक्ष, दिनांक १७ मार्च, २०१७.

८) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. आस्था २०१७/प्र.क्र.९५/रेशीम कक्ष, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७.

९) संचालक (रेशीम) यांचे पत्र क्र. कार्या-१/आस्था-३/अ.प.मु.वाढ/१८/१७५२ दि.१२.०१.२०१८

१०) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि. ८ जानेवारी, २०१८

शासन निर्णय :

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या वर नमूद दिनांक २७ ऑगस्ट, १९९७ च्या शासन निर्णयान्वये रेशीम संचालनालयाची स्थापना करण्यात आली असून विविध आस्थापनातून रेशीम संचालनालयाकडे पदे वर्ग करण्यात आली आहेत. संचालक (रेशीम) यांच्या अधिनस्त असलेल्या ३७३ पदांच्या आढाव्यास उच्चस्तरीय समितीने मान्यता दिली असून याबाबतचे आदेश वर नमूद दि. २२ मार्च, २०११ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. संदर्भीय क्र.३ नुसार जव्हार, जि.पालघर येथे नव्याने जिल्हा रेशीम कार्यालय निर्मितीबरोबर नवीन सहा पदांना शासनाने मंजूरी दिली आहे. त्यामुळे आता रेशीम संचालनालयातर्गत ३७९ पदांचा आकृतीबंध आहे. त्यापैकी संदर्भ क्र. ४ येथील दि. १४ ऑक्टोबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये स्थायी करण्यात आलेल्या २९ पदांसह एकूण ३०३ पदे स्थायी करण्यात आली आहेत. उर्वरित ७६ पदे ही अस्थायी पदे आहेत. ह्या अस्थायी पदांना वर अनु.

क्र. ८ येथे नमूद दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१ डिसेंबर,२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. या ७६ अस्थायी पदांना दिनांक १ जानेवारी २०१८ पासून पुढे सुरू ठेवण्यास मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव रेशीम संचालनालयाच्य दिनांक १२.१.२०१८ च्या पत्राने प्राप्त झाला आहे.

२. सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१.०१.२०१८ ते दिनांक २८.०२.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत.

३. सोबतच्या प्रपत्र **" अ "** व **" ब "** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ७६ अस्थायी पदे दिनांक १.०१.२०१८ पासून दिनांक २८.०२.२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास शासन मान्यता देत आहे.

४. या पदावर होणारा खर्च पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व वित्तीय वर्ष २०१७-२०१८ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक	:	व्ही-२
मुख्यलेखाशीर्ष	:	२४२५ सहकार
गौणशीर्ष	:	००१(०१)(१३) रेशीम संचालनालय (२४२५ १३४१) (दत्तमत)

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या वर नमूद दिनांक ८ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२५१३४६१७१४०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2018.01.25 13:50:25 +05'30'

(आ.अ.लोपिस)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र :- प्रपत्र "अ" व "ब"

प्रति,

१. संचालक, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत क्र.२, ६वा माळा, बी विंग, आयुक्त कार्यालय परिसर, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१
२. महालेखापाल, महाराष्ट्र १- (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), मुंबई.

३. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), नागपूर
४. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) / मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव.
५. सचिव (वस्त्रोद्योग) स. प.व व. वि. मंत्रालय, मुंबई
६. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. वरिष्ठ उप महालेखापाल (पडताळणी) बाहय लेखापरिक्षा विभाग (नागरी), मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०. सर्व जिल्हयांचे जिल्हा कोषागार अधिकारी.
११. वित्त विभाग (व्यय २-अर्थसंकल्प-१३/ आ.पु.क.) मंत्रालय,मुंबई.
१२. सर्व सहाय्यक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय,
१३. सर्व रेशीम विकास अधिकारी, श्रेणी-१/२, जिल्हा रेशीम कार्यालये,
१४. रेशिम विकास अधिकारी, श्रेणी-२, अंडीपुंज निर्मिती केंद्र गडहिंग्लज, जि. कोल्हापूर
१५. कार्यासन अधिकारी १७-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती .

रेशीम संचालनालयाच्या आस्थापनेवरील पदांचा तपशील

प्रपत्र-अ

(शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक: आस्था-२०१८/प्र.क्र.४/रेशीम कक्ष,

दि.२४ जानेवारी, २०१८ सोबतचे सहपत्र)

अ) तांत्रिक पदे:-

अ.क्र.	पदनाम	वेतन पे बॅन्ड	ग्रेड वेतन	मंजूर पदे	स्थायी पदे	मंजूर पदांपैकी अस्थायी पदे (६-५)	मुदत वाढ देण्यात येणारी पदे
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**७**	**८**
१	संचालक	१५६००-३९१००	७६००	१	१	०	०
२	उपसंचालक	९३००-३४८००	५४००	२	१	१	१
३	सहाय्यक संचालक	९३००-३४८००	४६००	४	२	२	२
४	रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१	९३००-३४८००	४४००	१२	१०	२	२
५	रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२	९३००-३४८००	४३००	२१	१७	४	४
६	ज्येष्ठ तांत्रिक सहायक	५२००-२०२००	२८००	५५	४४	११	११
७	ज्येष्ठ क्षेत्र तथा प्रयोग शाळा सहायक	५२००-२०२००	२४००	३१	२५	६	६
८	प्रयोग निर्देशक	५२००-२०२००	२०००	१४	११	३	३
९	क्षेत्र सहाय्यक	५२००-२०२००	१९००	११४	९१	२३	२३
१०	रेअरिंग ऑपरेटीव्ह	५२००-२०२००	१८००	६	५	१	१
११	रेअरर्स/परिचर/प्र.शा.परिचर	४४४०-७४४०	१३००	१०	८	२	२
१२	इलेक्ट्रीशियन	५२००-२०२००	१९००	१	१	०	०
१३	मॅकॅनिक	५२००-२०२००	१९००	१	१	०	०
	एकूण			**२७२**	**२१७**	**५५**	**५५**

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2018.01.25 13:50:36 +05'30'

(आ.अ.लोपिस)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

रेशीम संचालनालयाच्या आस्थापनेवरील पदांचा तपशील

प्रपत्र - ब

(शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक: आस्था-२०१८/प्र.क्र.४/रेशीम कक्ष,

दि.२४ जानेवारी,२०१८सोबतचे सहपत्र)

ब) अतांत्रिक पदे:-

अ.क्र.	पदनाम	वेतन पे. ब्रॅन्ड	ग्रेड वेतन	मंजूर पदे	स्थायी पदे	मंजूर पदांपैकी अस्थायी पदे (६-५)	मुदत वाढ देण्यात येणारी पदे
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**७**	**८**
१	लेखाधिकारी (सहा. संचालक)	१५६००-३९१००	५४००	१	१	०	०
२	वरीष्ठ अधिक्षक	९३००-३४८००	४३००	२	१	१	१
३	अधिक्षक (लेखा व आस्था)	९३००-३४८००	४२००	३	२	१	१
४	वरीष्ठ सहाय्यक	५२००-२०२००	२४००	१६	१३	३	३
५	लिपिक तथा टंकलेखक	५२००-२०२००	१९००	१७	१४	३	३
६	वाहन चालक	५२००-२०२००	१९००	१२	१०	२	२
७	शिपाई/मदतनीस/ पहारेकरी/माळी/ सफाई कामगार	४४४०-७४४०	१३००	५६	४५	११	११
	एकूण			**१०७**	**८६**	**२१**	**२१**
	एकूण प्रपत्र-अ			**२७२**	**२१७**	**५५**	**५५**
	एकूण प्रपत्र-ब			**१०७**	**८६**	**२१**	**२१**
	सर्व एकूण			**३७९**	**३०३**	**७६**	**७६**

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2018.01.25 13:50:45 +05'30'

(आ.अ.लोपिस)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन